# भुयारी मेट्रो डिसेंबरपासून धावणार

**प्रकल्पाचे बांधकाम ९७.८ टक्के तर स्थानकांचे बांधकाम ९३ टक्के पूर्ण**

**पहिल्या टप्प्यात ९ गाड्या धावणार**

**दर साडेसहा मिनिटाला गाडी**

**ऑक्टोबरमध्ये पहिली चाचणी**

**२०२४ पर्यंत प्रत्येकी ८ डब्यांच्या ३१ गाड्या कार्यरत होणार**

मुंबई, दि. १० (प्रतिनिधी) – मुंबई शहरातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी महत्वाचा असलेल्या मेट्रो-३ (कफ परेड ते बीकेसी) या भुयारी मेट्रो प्रकल्पाचे काम येत्या डिसेंबरपर्यंत पूर्ण होणार आहे. आतापर्यंत जवळपास ९० टक्के काम पूर्ण झाले आहे. ऑक्टोबरपर्यंत भुयारी मेट्रोची पहिली चाचणी होईल आणि येत्या डिसेंबरपर्यंत या मार्गावरील आरे ते बीकेसी स्थानक या टप्प्यावर प्रवासी वाहतूक सुरू करण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी रात्री उशिरा मेट्रो-३ च्या चर्चगेट ते विधानभवन या भुयारी स्थानकाची पाहणी केली. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या (एमएमआरसी) अधिकाऱ्यांनी त्यांना कामाची माहिती दिली. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला.

भुयारी मेट्रोचे काम प्रगतीपथावर असून मेट्रोमध्ये प्रवाशांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्यात आले आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन हवा, ध्वनी प्रदूषण होणार नाही याची काळजी घेण्यात आली आहे अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. भुयारी मेट्रोचा दुसरा टप्पा जून २०२४ पूर्वी पूर्ण केला जाईल असेही ते म्हणाले.




मेट्रो-३ च्या तीन गाड्या मुंबईत दाखल झाल्या आहेत. आणखी दोन गाड्या श्रीसीटी आंध्र प्रदेश येथील ऑस्तोम कारखान्यातून मुंबईकरिता रवाना झाल्या असून १७ किंवा १८ मेपर्यंत त्या मुंबईत पोहोचतील. इतर चार गाड्या या प्रत्येक महिन्यात दोन अशा प्रकारे मुंबईत आणल्या जाणार आहेत.

## लोकल आणि मोनो रेल्वेला जोडणार

मेट्रो ३ तसेच मेट्रो-१, २, ६ आणि ९ बरोबर मोनो रेल्वेशी ही जोडण्यात येणार आहे. याशिवाय चर्चगेट आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस तसेच मुंबईतील विमानतळांशीही मेट्रो जोडली जाणार आहे.

## रस्त्यावरील सहा लाख वाहने कमी होणार

भुयारी मेट्रोमुळे मुंबईकरांचा प्रवासात खर्च होणारा बराचसा वेळ वाचणार आहे. भुयारी मेट्रो सुरू झाल्यानंतर रस्त्यावरील सुमारे सहा लाख वाहने कमी होतील असा विश्वास यावेळी मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.